


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०४३ ● पुणे ● बुधवार, दि. २५ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


अध्यात्मिक आणि भौतिक जीवनाचा समतोल... 3


अध्यक्षपदी बाळासाहेब सांडभोर 4

## ड्रेनेजच्या दुर्गंधीपासून आणि भूपेंद्र मोरे यांच्या प्रयत्नातून

# नऱ्हेकर घेणार मोकळा श्वास

- 2 कोटी रुपयांच्या ड्रेनेज लाईनचे काम अखेर सुरू
- अजितदादा पवार, रूपाली चाकणकर यांचे आभार : मोरे
- "ट्रॅफिकमुक्त नऱ्हे"साठी प्रयत्न करणार असल्याची भूपेंद्र मोरे यांची ग्वाही



**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेतील समाविष्ट असलेल्या नऱ्हेगावातील रस्त्यावर वाहणाऱ्या ड्रेनेजला अखेर लगाम बसणार आहे. नऱ्हे परिसरातील रस्त्यावर वाहणाऱ्या ड्रेनेज आणि दुर्गंधी पासून नऱ्हेकर भूपेंद्र मोरे यांच्या प्रयत्नातून हा "मोकळा श्वास घेणार असल्याची प्रचिती होत आहे ..

नऱ्हेतील ड्रेनेज लाईन साठी विधानसभा निवडणुकीपूर्वीच दोन कोटी रुपये निधी मंजूर केला होता. मात्र त्यानंतर निवडणुका आल्यामुळे आचारसंहितेमुळे काम ठप्प होते. अखेर 20 डिसेंबर पासून चाकणकर कॉर्नर पासून ह्या कामाला सुरुवात झाली आहे. अभिरुची परांजपे चाकणकर कॉर्नर व नवले इंडस्ट्रियल एरिया ते चाकणकर कॉर्नर असे एकूण 1080 मीटर भूमिगत ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार आहे. 600 मिलिमीटर च्या व्यासाची ही लाईन टाकण्यात येणार आहे.. प्रारंभीच्या टटप्प्यामध्येचाकणकर कॉर्नर ते अभिरुची परांजपे ह्या लाईनचे काम सुरु करण्यात आले. सध्या रात्री उशिरा काम करण्यात येत आहे.

चाकणकर कॉर्नर येथे हे सुरु झालेल्या या कामाची पाहणी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी कार्यकर्त्या सोबत केली.यावेळी त्यांनी काही सूचनाही संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना दिल्या.व माध्यमांशी संवाद साधला. ह्या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी विविध आंदोलने केली होती.

शिवाय शासन दरबारी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे हा विषय सातत्याने आग्रही लावून धरला होता. त्यास चांगले यश आले आहे. पाहणी दरम्यान बोलताना भूपेंद्र मोरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या प्रयत्नातून हे काम साकार झाले असल्यामुळे त्यांचे भूपेंद्र मोरे यांनी आभार मानले.

### नागरिकांनी सहकार्य करावे

नऱ्हेतील पूर्वीची कमी व्यासाची ड्रेनेज लाईन होती. वाहणारी सांडपाणी हे जास्त असल्यामुळे रस्त्यावरून सांडपाणी वाहत होते. आता प्रश्न कायमचा मिटणार आहे. सुरुवातीस अभिरुची परांजपे ते चाकणकर कॉर्नर ह्या लाईन काम झाल्यानंतर नवले इंडस्ट्रियल एरिया ते चाकणकर कॉर्नर ह्या लाईनचे काम करण्यात येणार आहे. यामुळे या भागातील वाहतुकीवर परिणाम होणार आहे. नागरिकांनी सहकार्य करावे. **- निशिकांत छापेकर, कनिष्ठ अभियंता, पुणे मनपा**

ह्या भागातील "ट्रॅफिकमुक्त नऱ्हे" करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. हे काम दीर्घकाळ सुरु असल्यामुळे या भागातील नागरिकांना त्रास होणार आहे. मात्र तरीही नागरिकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करून सहकार्य करावे असे आवाहन भूपेंद्र मोरे यांनी पुढे बोलताना व्यक्त केले..

आगामी काळात पारे चौक ते गंधर्व चौक ह्या भागातील वाहतुकीवर परिणाम होणार आहे. ह्या भागातील नागरिकांनी श्री कंट्रोल चौक , धायरी या पर्यायी रस्त्याचा वापर करावा.असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे. भूपेंद्र मोरे यांच्या ह्या कामाबद्दल परिसरातील नागरिकांनी त्यांचे कौतुक व्यक्त केले.. ह्या पाहणी दरम्यान राजाभाऊ जाधव, हरीश वैद्य ,लतीफ शेख, नागरिक, मनपा कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

**नऱ्हेकरांच्या समस्येवर तोडगा : शासनाकडून अभिरुची परांजपे ते गंधर्व चौक**

### ड्रेनेज लाईनसाठी दोन कोटी रुपये मंजूर

**भूपेंद्र मोरे यांची माहिती : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व महायुती सरकार यांचे मानले आभार**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेत जाऊनही गैरसोयीने हैराण झालेल्या नऱ्हेकरांसाठी शासनाने अखेर उपाययोजना केली.मोठ्या व्यासाच्या ड्रेनेजसाठी चार कोटी रुपयांची गरज होती .त्यातील पहिल्या टप्यातील अभिरुची परांजपे ते गंधर्व चौक ह्यां ड्रेनेज लाईनसाठी 2 कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला कार्याध्यक्ष भुपेंद्र मोरे यांनी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून रस्त्यावर वाहणारे ड्रेनेजमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. त्यासाठी आपण सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करत होतो. ह्यां समस्यासाठी आमरण उपोषण, आंदोलने करतं विषय मांडण्याचा प्रयत्न केला. मागील काही महिन्यापूर्वी नऱ्हेकरांच्या समस्यांचा पोस्टमार्टम करत नागरी बैठक घेऊन याविषयी आवाज उठवला. पुणे महानगरपालिकेला घेराव घालण्याचा इशारा दिला होता. त्यावर मशीन द्वारे तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली. या संदर्भात उपमुख्यमंत्री



अजितदादा पवार यांचे भेट घेऊन या विषयावर चर्चा करून निवेदन देण्यात आले.त्यावेळी समाविष्ट गावाच्या विकास आराखड्यात हा विषय घेऊन निधी मंजूर करण्याचें आश्वासन त्यांनी दिले होते.नुकतेच शासनाने समाविष्ट गावांच्या विकासकामाच्या पॅकेजमध्ये ड्रेनेजलाईनच्या पहिल्या टप्यासाठी दोन कोटी रुपये मंजूर केले आहेत.

हा पहिला टप्पा अभिरुची परांजपे सोसायटी ते गंधर्व चौक या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार आहे.वर्क ऑर्डर प्रक्रिया पूर्ण होऊन पुढील आठवड्यात ह्या कामास सुरुवात होणार आहे असेही भूपेंद्र मोरे यांनी सांगितले. या भागातील नागरी रस्त्यावर होणारे ड्रेनेज लाईन ,पाणीपुरवठा ट्रॅफिक व यामुळे नागरिक मेटाकुटीला आले होते .पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊन ही कामे होत नसल्याने गड्या ग्रामपंचायत बरी असा नागरिकांत सुर उमटत होता. वाढत्या लोकसंख्येमुळे कमी व्यासाची ड्रेनेज अपुरी पडत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे होते.मोठ्या व्यासाच्या ड्रेनेजलाईनसाठी निधी मंजूर झाल्यामुळे हा प्रश्न सुटणार आहे.

भविष्यातही ट्रॅफिक समस्या व इतर समस्यावरही आपण प्राधान्य देणार आहोत अशी माहितीही भूपेंद्र मोरे यांनी दिली आहे.

अभिरुची परांजपे ते गंधर्व चौक ह्यां ड्रेनेजलाईनसाठी दोन कोटी रुपये मंजूर झाले आहेत.वर्कऑर्डर झाल्यानंतर लवकरच कामास सुरुवात करण्यात येईल.
**- निशिकांत छाफेकर** अभियंता मलनिस्सारण विभाग, पुणे मनपा

नऱ्हेकरांचा एक महत्त्वाचा प्रश्न सोडवल्याबद्दल मी शासन व भूपेंद्र मोरे यांचे आभार मानतो. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगला विषय आपण मांडला आहे.
**- मिलिंद मराटे, नागरिक**

### नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान हाच आशीर्वाद : भूपेंद्र मोरे

नऱ्हेतील प्रत्येक नागरिकांनी नरक यातना भोगल्या. रस्त्यावर होणारे ड्रेनेजने हैराण केले होते. "नऱ्हेकरांच्या समस्याचे पोस्टमार्टम " करत मनपा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. ह्यानंतर कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातूनया कामाची वर्क ऑर्डर यापूर्वीच निघाली होती. मात्र निवडणुका ,दिवाळी ह्यामुळे हे काम पुढं सुरू झाले नव्हते. नागरिकांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून एक समाधान नक्की वाटतं की आपण जनतेसाठी प्रयत्न करतोय त्यास कुठंतरी यश मिळत आहे. आगामी काळात नऱ्हेतील पाणी प्रश्न, "ट्रॅफिकमुक्त नऱ्हे"व विविध समस्या सोडवण्याचा प्रयत्न सुरूच राहणार आहे. **- मा.श्री.भूपेंद्र मुरलीधर मोरे, सामाजिक कार्यकर्ते**

# पुण्यासाठी दोन महापालिका आवश्यक

## निर्णयासाठी उशीर चालणार नसल्याची चंद्रकांत पाटील यांची भूमिका




समाविष्ट गावांमुळे शहराची हद्दवाढ झाली आहे. त्यामुळे आणखी उशीर न करता स्वतंत्र महापालिका आवश्यक आहे. नावामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यावर चर्चा करून त्याचे स्वरूप निश्चित करावे लागेल.
**– चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'शहराच्या वाढत्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता शहरासाठी दोन महापालिका कराव्या लागतील. दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी उशीर चालणार नाही. कटक मंडळांच्या विलीनीकरणाबाबतही तातडीने निर्णय घ्यावा लागेल,' अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी मांडली. जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमित सुरू होईल. त्या वेळी हे विषय प्राधान्यक्रमांचे असतील, असेही ते म्हणाले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने नवनिर्वाचित आमदार आणि मंत्र्यांसमवेत 'शहर विकासाची 25 वर्षे' या विषयावर वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

'समाविष्ट गावे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे महापालिकेवर ताण येत आहे. त्यामुळे पुण्यासाठी पूर्व आणि पश्चिम अशा दोन स्वतंत्र महापालिका कराव्या लागतील,' असा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेसचे हडपसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चेतन तुपे यांनी मांडला. हा धागा पकडून चंद्रकांत पाटील यांनी स्वतंत्र महापालिकेची आवश्यकता अधोरेखित केली.

'शहरामध्ये केवळ एक महापालिका असून चालणार नाही. राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक असे अनेक विषय गुंतले आहेत. त्याचा विचार करून शहराचे काही भाग करावे लागतील.


पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) शहरात असले, तरी ती महापालिका नाही. त्यामुळे दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी आता उशीर करून चालणार नाही,' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

पाटील म्हणाले, 'महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे आहे. त्यामुळे या संदर्भात व्यापक चर्चा करावी लागेल. नावांचा प्रश्नही अशा वेळी महत्त्वाचा ठरतो. त्यातही पुणे शहराला एक इतिहास आहे. त्यामुळे महापालिका करताना पुणे नावाचा समावेश असावा, याबाबत सगळेच आग्रही असतील. मात्र, अशा गोष्टींवर साधकबाधक चर्चा करून विभाजनाचा निर्णय घेतला जाईल.

राज्यात महायुतीला बहुमत मिळाले आहे. मंत्र्यांचे खातेवाटपही झाले आहे. त्यानुसार जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमितपणे सुरू होईल. त्यावेळी हे विषय प्राधान्याने घेतले जातील. महापालिकेची निवडणूक एप्रिल- मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा विषयांना उशीर करून चालणार नाही.'

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२





# मुत्सद्दी राजनीतिज्ञ अटलजी

**नरेंद्र मोदी : पंतप्रधान**

आज 25 डिसेंबर हा आपल्या सर्वांसाठी खूप विशेष दिवस आहे. आपला देश आपले लाडके माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची 100वी जयंती साजरी करत आहे. उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे मुत्सद्दी राजनीतिज्ञ म्हणून, ते आजही अगणित लोकांना प्रेरणा देतात. 21व्या शतकात प्रवेश करताना भारताचे स्थित्यंतर घडवणारे शिल्पकार म्हणून, आपला देश अटलजींप्रति सदैव कृतज्ञ राहील. पंतप्रधान म्हणून त्यांनी 1998 मध्ये शपथ घेतली तेव्हा आपला देश राजकीय अस्थिरतेच्या गर्तेतून बाहेर पडत होता. सत्तेवर येणारी सरकार कसा कारभार करतील याबाबत लोक साशंक होते. अटलजींनीच स्थिर आणि प्रभावी राज्यकारभार देऊन हा प्रवाह उलट दिशेने वळवत परिस्थिती अनुकूलपणे पालटवली. अटलजींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने, तंत्रज्ञान सामान्य नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा, प्रयत्न केला. हे करताना सोबत भारताला एकत्र जोडण्याची, जवळ आणण्याची दूरदृष्टी होती. आजही अनेकजण भारतातील मुख्य ठिकाणे चहू दिशांनी जोडणाऱ्या सुवर्ण चतुष्कोन या महामार्ग प्रकल्पाची आठवण काढतात. पंतप्रधान ग्रामसडक योजनेसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक दळणवळण वाढवण्याचे वाजपेयी सरकारचे प्रयत्नही तितकेच उल्लेखनीय होते. त्याचप्रमाणे, त्यांच्या सरकारने दिल्ली मेट्रोच्या माध्यमातून दळणवळण व्यवस्थेला-वाहतुकीला चालना दिली. दिल्ली मेट्रो प्रकल्प आज जागतिक दर्जाचा पायाभूत सुविधा प्रकल्प म्हणून जगात वाखाणला जातो. अशा प्रकारे, वाजपेयी सरकारने केवळ आर्थिक विकासालाच चालना दिली. सामाजिक क्षेत्राचा विचार करायचा झाला, तर सर्व शिक्षा अभियान हा उपक्रम अटलजींनी आधुनिक भारताची उभारणी करण्याचे स्वप्न पाहिले होते. जिथे देशातील सर्वांना विशेषतः गरीब आणि वंचित घटकांना आधुनिक शिक्षण उपलब्ध असेल, ते अधोरेखित करतो. त्याचवेळी त्यांच्या सरकारने अनेक आर्थिक सुधारणा करून भारताच्या आर्थिक उत्थानाचा पाया रचला. जी अर्थव्यवस्था अनेक दशकांपासून घराणेशाहीला प्रोत्साहन देणाऱ्या आर्थिक तत्त्वज्ञानाच्या मार्गावर चालल्यामुळे ठप्प झाली होती. त्यांच्या नेतृत्वाचा दाखला 1998 च्या उन्हाळ्यात घडलेल्या घटनेतून पाहायला मिळतो. त्यांचे सरकार नुकतेच सत्तेवर आले होते आणि 11 मे रोजी भारताने ऑपरेशन शक्ती या नावाने ओळखली जाणारी पोखरण अणुचाचणी केली. या अणुचाचणीने भारताच्या वैज्ञानिक समुदायाच्या सामर्थ्याची वेगळी ओळख जगासमोर आणली. भारताने अणुचाचणी केल्याने संपूर्ण जग थक्क झाले आणि त्याचवेळी काही देशांनी याबद्दल विनाकारण आपल्या संतापाचे देखील प्रदर्शन केले. यावेळी एखाद्या सामान्य नेत्याने कच खाल्ली असती, पण अटलजी हे वेगळ्या मातीतून घडलेले नेते होते. भारत खंबीर राहिला आणि दोन दिवसांनी 13 मे रोजी आणखी चाचण्या करण्याचे आदेश देत सरकारने आपला निर्धार दाखवून दिला. 11 मे रोजी झालेल्या चाचण्यांनी वैज्ञानिक कौशल्याचे दर्शन घडवले, तर 13 मे रोजी केलेल्या चाचण्यांनी खऱ्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. हा संपूर्ण जगाला दिलेला एक संदेश होता की आता ते दिवस मागे पडले आहेत ज्यावेळी भारत कोणत्याही इशाऱ्याखाली किंवा दबावाखाली येऊ शकेल. आंतरराष्ट्रीय दबावानंतरही वाजपेयी सरकार, आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याच्या भारताच्या अधिकाराचे आणि त्याचवेळी जागतिक शांततेचा भारत खंदा पुरस्कर्ता असल्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. भारतीय राजकारणातील आघाड्यांची व्याख्या बदलणाऱ्या रालोआचे अध्यक्षपद अटलजींनी भूषवले. रालोआला विकासाचे, राष्ट्रीय प्रगतीचे आणि प्रादेशिक महत्त्वाकांक्षांचे सामर्थ्य बनवले. त्यांच्या राजकीय प्रवासातून त्यांची संसदीय प्रतिभा दिसून येते. मूठभर खासदार असलेल्या पक्षाचे ते सदस्य होते पण त्यांचे शब्द त्या काळात अति-शक्तिमान असलेल्या काँग्रेसच्या सामर्थ्याला हादरवण्यासाठी पुरेसे होते. एक पंतप्रधान म्हणून त्यांनी विरोधकांच्या टीकेला स्वतःच्या शैलीने आणि विद्वत्तापूर्ण संवादांनी बोथट केले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा बराच काळ त्यांनी विरोधी बाकांवर व्यतीत केला होता पण त्यांनी कधीही कोणा विरोधात मनात कडवटपणा ठेवला नाही. काँग्रेसने त्यांना गद्दार असे संबोधण्यापर्यंतची खालच्या पातळीतील टीका केल्यावरही त्यांनी आपला संयम गमावला नाही.

संधीसाधू डावपेचांचा वापर करून सत्ता मिळवण्याची हाव त्यांना कधीही नव्हती. 1996मध्ये घोडेबाजार आणि घाणेरड्या राजकारणाच्या मार्गावर चालण्यापेक्षा त्यांनी राजीनामा देणे योग्य मानले. 1999मध्ये केवळ एका मताने त्यांच्या सरकारचा पराभव झाला. अशा प्रकारच्या अनैतिक राजकारणाला आव्हान देण्याचा सल्ला त्यांना अनेकांनी दिला, मात्र त्यांनी नियमांना अनुसरून वाटचाल करण्याचा निर्णय घेतला. शेवटी जनतेनेच त्यांना भव्य बहुमताने पुन्हा एकदा सत्तेवर आणले. ज्यावेळी आपल्या संविधानाच्या रक्षणाचा विषय येतो त्यावेळी अटलजी सर्वांपेक्षा वरच्या स्थानावर दिसतात. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या हौतात्म्याने ते कमालीचे व्यथित झाले होते. त्यानंतर अनेक वर्षांनी ते आणीबाणी विरोधी चळवळीचे प्रमुख स्तंभ बनले. आणीबाणीनंतरच्या 1977च्या निवणुकांमध्ये त्यांनी आपल्या स्वतःच्या पक्षाचे (जन संघ) जनता पक्षात विलिनीकरण करण्यासाठी सहमती दर्शवली. त्यांच्यासाठी आणि इतरांसाठी हा निर्णय नक्कीच वेदनादायी ठरला असेल, अशी माझी खात्री आहे. पण कोणत्याही परिस्थितीत संविधानाचे रक्षण त्यांच्यासाठी महत्त्वाचे होते. अटलजी भारताचे परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभांमध्ये हिंदी भाषेत भाषण करणारे ते पहिले भारतीय नेते ठरले. त्यांच्या या कृतीतून भारताबद्दलचा त्यांचा अपार अभिमान दिसून येतो.

अटलजींचे व्यक्तिमत्त्व हे कोणालाही आपल्याकडे अगदी सहजपणे आकर्षून घेणारे होते. आपल्या जीवन प्रवासात समृद्ध साहित्यकृतींच्या निर्माता असलेल्या या लेखक, कवी मनाच्या व्यक्तिमत्त्वाने आपल्या लेखनात शब्दांचा वापर हा प्रेरणा देण्यासाठी आणि कधी, तर सहवेदना व्यक्त करण्यासाठी केला. त्यांच्या असंख्य काव्य रचनांमध्ये तर त्यांच्या मनातील संघर्षांचे आणि राष्ट्राविषयीच्या आशांचे प्रतिबिंब उमटलेले आपल्याला दिसते. भारतीय जनता पक्षाच्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचे तर हे भाग्यच होते की आम्हाला अटलजींसारख्या व्यक्तीमत्त्वाकडून शिकता आले, त्यांना जाणून घेता आले, त्यांच्याशी संवाद साधता आला. भाजपासाठी त्यांनी दिलेले योगदान हे खऱ्या अर्थाने आधारभूत असे मोलाचे योगदान होते. लालकृष्ण अडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्यासारख्या दिग्गज सहकाऱ्यांच्या सोबतीने त्यांनी पक्षाला त्याच्या स्थापनेपासूनच आकार दिला. जेव्हा जेव्हा विचारधारा आणि सत्ता यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली, त्या त्या वेळी त्यांनी कायमच विचारधारेचीच निवड केली. काँग्रेसच्या चष्म्यातून जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा असा जागतिक दृष्टीकोन भारतासाठी शक्य आहे आणि असा जागतिक दृष्टिकोन भारताला लाभदायक ठरू शकतो हे देशाला पटवून देण्यात ते यशस्वी झाले.

---

### बिग्रो सक्सेस एज्युकेशन प्रा. लि. या संस्थेच्या मार्गदर्शनाने

# 25 डिसेंबरला 25 पेक्षा जास्त पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बिग्रो ही फायनान्शिअल आणि बिझनेस ग्रोथ करण्यासाठी मार्गदर्शन करणारी संस्था आहे. या संस्थेमध्ये शिकवल्या जाणाऱ्या स्ट्रॅटेजींच्या वापर करून आतापर्यंत भरपूर जणांनी फायनान्शिअल ग्रोथ केलेली आहे, त्यांचे उत्पन्न-व्यवसाय पटींमध्ये वाढवलेला आहे.

आपल्या उद्योग व्यवसाय वाढीसाठी पुस्तक लिहिणे ही सुद्धा एक खूप फायदेशीर स्ट्रॅटेजी आहे आणि म्हणूनच बिग्रो ही संस्था बिझनेस वाढीसाठी पुस्तक लिहिण्यासाठी उद्योजकांना प्रेरित करते आणि त्यांना पुस्तक लिहिण्यासाठी मार्गदर्शनही करते. आणि त्यांच्या मार्गदर्शनाने मागील वर्षी एकाच दिवशी 21 पुस्तकांचे प्रकाशन करून वर्ल्ड रेकॉर्ड केले आहे.

याच धर्तीवर यावर्षीही म्हणजेच 25 डिसेंबर 2024 या दिवशी 33 पेक्षा जास्त लेखकांच्या 25 पेक्षा जास्त पुस्तकांचे प्रकाशन करून एक नवीन वर्ल्ड रेकॉर्ड केले जाणार आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा जवळपास 750 पेक्षा जास्त जणांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे आणि या सोहळ्यास 25+ अधिकारी आणि उद्योजक उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

बिग्रोचे संस्थापक आणि संचालक दादा भापकर आणि मोहसीन पठाण यांनी स्वतः फायनान्शिअल फ्रीडम मिळवून या संस्थेची तीन वर्षांपूर्वी स्थापना केली.

आतापर्यंत त्यांनी 2100 सेशन्स घेतलेले आहेत त्यामधून 15000 पेक्षा जास्त यांना मार्गदर्शन केलेले आहे आणि 1000 पेक्षा जास्त जणांना नोकरी-व्यवसायातून उत्पन्न वाढण्यासाठी, फायनान्शिअल फ्रीडम मिळवण्यासाठी वैयक्तिक मार्गदर्शन केलेले आहे. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे.

नवीन लेखकांना पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त करण्यासाठी तसेच त्यांना मार्गदर्शन मिळण्यासाठी या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. आपल्यासारख्या उद्योजकांची आणि साहित्यप्रेमींची उपस्थिती हा सोहळा अधिक संस्मरणीय बनवेल. आपली उपस्थिती आपली उपस्थिती नक्कीच कार्यक्रमाची शोभा वाढवेल. प्रवेशिकेसाठी संपर्क- 9309013368.

स्थळ - द ऑडिटोरियम, एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉल, चिंचवड, पुणे.

वेळ - दुपारी 2.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत

टीप - प्रवेशासाठी नाव नोंदणी आवश्यक

---



## दूध कांडी, बुल पॉवर गायी, बैलांना पोषक आहार : टाकळकर

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

आयुर्धन वेलनेसची दूध कांडी व बुल पॉवर उत्पादन आयुर्वेदिक पोषक आहार आहे. या आहाराला आयएसओ मानांकन व पशुवैद्यकीय मान्यता आहे. बुल पॉवर दिल्यानंतर दहा ते बारा दिवसांनंतर बैलाची पळण्याची कार्यक्षमता व रोगप्रतिकारशक्ती वाढते, असा बैलगाडा मालकांचा अनुभव आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे रामकृष्ण टाकळकर यांनी तिन्हेवाडी (ता. खेड) येथे केले.

## पीआयसीटी महाविद्यालयात "इलेक्ट्रोमॅग्नेटिक्स आणि शाश्वतता" विषयावर आंतरराष्ट्रीय सत्राचे यशस्वी आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT),JCAME आणि IEEE पीआयसीटी AP-S विद्यार्थी शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने "इलेक्ट्रोमॅग्नेटिक्स आणि शाश्वतता" या विषयावर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. IEEE अँटेना आणि प्रोपोगेशन सोसायटीच्या (AP-S) 75व्या वर्धापन दिनानिमित्त नुकताच हा कार्यक्रम इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागात पार पडला. कार्यक्रमात नामांकित तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये डॉ. वेंग चो च्यू (पर्ड्यू विद्यापीठ), डॉ. अजय पोद्दार (सिनर्जी मायक्रोवेव्ह, USA), प्रा. जी. एस. मणी (IEEE JCAME पुणे अध्यक्ष), प्रा. यहिया अंतर (कॅनडा), डॉ. मुरलीधरन (ॲडव्हान्सड सिस्टिम्स), आणि डॉ. पुनीतकुमार मिश्रा (ISRO) यांचा समावेश होता. तज्ज्ञांनी इलेक्ट्रोमॅग्नेटिक्समधील तंत्रज्ञान आणि शाश्वततेसाठी त्याचा महत्त्वपूर्ण वापर यावर प्रकाश टाकला.



कार्यक्रमाचे आयोजन डॉ. वाय. रविंदर आणि डॉ. एम. व्ही. मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी आणि प्राचार्य डॉ. एस. टी. गंधे यांचा कार्यक्रमासाठी मोलाचा पाठिंबा मिळाला. विशेषतः, वंचित विद्यार्थ्यांसाठी "डू-इट-युअरसेल्फ" किट्स वापरून इलेक्ट्रोमॅग्नेटिक्सवरील सत्र आयोजित करण्यात आले. तसेच, IEEE ने "ME and Electromagnetics" नावाची प्रयोगशाळा सुरू केली. PICT च्या स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आणि त्यांच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांचे कौतुक झाले.

हा कार्यक्रम शाश्वत तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि सहयोग वाढवण्याच्या दिशेने यशस्वी ठरला.

---

# बाप्पूसाहेबांना आगामी काळात मोठी संधी मिळेल

### *आ. भिमराव तापकीर यांचे प्रतिपादन : बाप्पूसाहेब पोकळे यांच्या दिनदर्शिकेचे आ. तापकीर यांच्या हस्ते प्रकाशन*

**पुणे धायरी (दै. आरंभ पर्व)**

गेली अनेक वर्षापासून बापूसाहेब पोकळे हे धायरी भागामध्ये "अखंड जनसेवेचा वसा "घेऊन अविरतपणे कार्य करत आहेत.

त्यामुळे या भागातील जनतेमध्ये त्यांची चांगली प्रतिमा आहे.पोकळे यांना आगामी काळामध्ये मोठी संधी प्राप्त होईल असा विश्वास आमदार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केला आहे.

भाजपा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे सरचिटणीस , धायरीचे युवा नेते बापूसाहेब पोकळे यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन खडकवासला मतदारसंघाचे आ.भीमराव तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले.



त्यावेळी त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

धायरी व परिसराच्या विकासासाठी सातत्याने त्यांची आग्रही भूमिका असते. त्यांच्या पाठीशी मी आगामी काळामध्ये नक्कीच असणार आहे. जनतेचे खूप प्रेम त्यांच्यावर आहे. योग्य वेळी त्यांना जन आशीर्वाद नक्कीच मिळणार आहे. असा ठाम विश्वास ही आ.भीमराव तापकीर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी धायरी प्रभाग अध्यक्ष तुषार पोकळे,उद्योजक सागर पोकळे, ऋषी पोकळे, दादा भूरूक आदी मान्यवर उपस्थित होते.

पोकळे यांची दिनदर्शिका चांगल्या प्रकारे संपादित केली असल्यामुळे अनेक नागरिक पोकळे यांच्या संपर्क कार्यालयातून दिनदर्शिका घेऊन जातात. कॅलेंडर वाटप उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे..

धायरी व परिसरामध्ये हजारो नागरिकांना दिनदर्शिकेचे वाटप करण्यात येणार आहे.

बापूसाहेब पोकळे यांच्या खडक चौक धायरी येथील संपर्क कार्यालयामध्ये ही दिनदर्शिका उपलब्ध आहे. नागरिकांनी लाभ घ्यावा असा आवाहन संपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## थोडक्यात



### कविता जन्माला यावी लागते – वि.ग.सातपुते

**उरूळी कांचन (आरंभ पर्व) :** कविता करता येत नाही. ती जन्माला यावी लागते. माणसाचे जीवन हे माणसांच्या सहवासातून वाढते. सहवासातून संस्कार घडतात. संस्कारातून कृतज्ञता आपल्यासमोर येते आणि जीवन आपले कृतार्थ होते. त्याचप्रमाणे शब्द हे ईश्वराचे दान आहे. मात्या पित्याला मूल असते तसेच कविताही कवींचे अपत्य असते. ते शब्द ओळी अंतरा मिळून कविता तयार होते. त्यामुळे कवितेवरही तेवढेच प्रेम असते. कवितेवर चांगले संस्कार केल्यास ती सुंदर कविता ओठावर येते असे विचार सातपुते आप्पा यांनी व्यक्त केले. साहित्य सम्राट पुणे आणि माणुसकी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने 196 वे कवी संमेलन धायरी पुणे येथील मनोहर हॉलमध्ये संपन्न झाले. यावेळी मंचावर माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भवाळकर, ज्येष्ठ साहित्यिक वि.ग.सातपुते, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत भालेराव आणि साहित्य सम्राट संस्थेचे अध्यक्ष विनोदजी अष्टुळ मान्यवर उपस्थित होते. साहित्यिकांनी माणुसकीची चावी ओळखून साहित्य लिहिले पाहिजे आणि ते साहित्य सम्राटासारखे रुबाबदार झाले पाहिजे. असे मत अष्टुळ यांनी प्रास्ताविकेत व्यक्त केले. यावेळी हिंदी मराठी कवी कवयित्रींचे कवीसंमेलन संपन्न झाले. यामध्ये रसिका भवाळकर, रेखा साळुंखे, लता कुलकर्णी, रागिनी जोशी, नलिनी पवार, अलका पाटील, अनघा असलेकर, श्रद्धा असलेकर, छाया भगत, अनिता रानडे, सतीश शिंगवेकर, जितेंद्र सोनवणे, अविनाश असलेकर, महिंद्रा माणिक, हृदयी प्रकाश वैद्य, शाहीर शिवाजी थिटे, राहुल भोसले, प्रा. रेखा फाले, किशोर टिळेकर, सूर्यकांत नामगडे, प्रा. आनंद महाजन आणि प्रार्थना सदावर्ते इ. कवी कवयित्रींनी काव्य रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विनोद अष्टुळ यांनी तर आभार डॉ.राजेंद्र भोळे यांनी व्यक्त केले.

### दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन करण्यात यावे

- सामाजिक कार्यकर्ते राखी रासकर तानाजी कांबळे यांची मागणी

**पुणे (आरंभ पर्व) :** नुकतेच महाराष्ट्र सरकारने लाडक्या बहिणींना दर महिन्याला अनुदान स्वरुपात पंधराशे रुपये देत आहेत या योजनेच्या धर्तीवर दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये पेन्शन करण्यात याव अशी मागणी लेखिका सामाजिक कार्यकर्त्या रेखा रासकर तसेच तानाजी कांबळे यांनी शासनाकडे केली आहे. महाराष्ट्र सरकारने याचा गांभीर्याने विचार करावा. तातडीने मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घ्यावा कारण अनेक राज्यांमध्ये दिव्यांगाना अशा प्रकारे सहा हजार रुपये पेन्शन दिली जाते दिव्यांगाची ही मागणी अनेक दिवसांपासून सातत्याने शासन दरबारी अनेक दिव्यांग संघटना संस्था सामाजिक कार्यकर्ते मांडत आहेत पण कुठेही त्याला यश आलेले दिसत नाही सध्या अधिवेशनाचा काळ सुरु असल्याने यामध्ये निर्णय होणे अपेक्षित असून दिव्यांगाच्या या मागणीला सरकारने गांभीर्याने विचार करावा अनेक दिव्यांग निराधार असून त्यांना कुठल्याही प्रकारचे उपजीविकेचे साधन उपलब्ध नाही दिव्यांगांसाठी गाव स्तरावर समन्वयक नेमून त्यांना शासनाच्या योजनेचा लाभ प्रत्यक्षरीत्या करून देण्यात यावा अशी मागणीही सामाजिक कार्यकर्त्या लेखिका राखी रासकर व सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांनी सांगितले मागणीचा आम्ही सातत्याने या आधीच्या सरकारकडे पाठपुरावा केला असल्याचे त्यांनी सांगितले.

# अध्यात्मिक आणि भौतिक जीवनाचा समतोल जीवन सुसह्य करेल

## जया किशोरी यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२४' प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने प्रसिद्ध अध्यात्मिक आणि प्रेरक वक्त्या जया किशोरीजी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार 2024' प्रदान करण्यात आला. अध्यात्म आणि प्रेरणादायी वक्तृत्व क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुण्यात आयोजित सोहळ्यात 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या हस्ते जया किशोरी यांना सन्मानचिन्ह, सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थीनींनी बनविलेला विशेष स्कार्फ, सुवर्णपदक व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

पुरस्काराचा नम्रपणे स्वीकार करत जया किशोरी म्हणाल्या, "पंचवीस वर्षांचा प्रेरणादायी प्रवास असलेल्या 'सूर्यदत्त' संस्थेकडून मिळालेला हा पुरस्कार अभिमानास्पद आहे. विविध ज्ञानशाखांसोबत विद्यार्थ्यांना येथे सर्वांगीण शिक्षण दिले जातेय, हे महत्वाचे आहे. आज युवकांना आध्यत्मिकतेची सर्वात जास्त गरज आहे. भौतिकवादी जगण्याला अध्यात्मिकतेची जोड दिली, तर जीवन अधिक सुसह्य होईल. शिकत राहणे हा परिवर्तनाचा नियम आहे आणि हे मूल्य सूर्यदत्त संस्थेत रुजवले जाते, याचा आनंद वाटतो."

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "जया किशोरी या एक भारतीय आध्यात्मिक वक्त्या, गायिका, प्रेरक वक्त्या, जीवन प्रशिक्षक आणि सामाजिक सुधारणावादी नेत्या आहेत. त्यांच्या आध्यात्मिक प्रवचनांसाठी आणि भावपूर्ण भजनांसाठी लाखो भक्तगण आसुसलेले असतात. 'किशोरीजी' आणि 'आधुनिक युगातील मीरा' म्हणून त्यांना ओळखले जाते. अशा या महान व्यक्तीचा सन्मान करताना सूर्यदत्त परिवाराला आनंद होत आहे. त्यांच्या आदर्श कार्यातून 'सूर्यदत्त'मधील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल."

आपल्या उत्कृष्ट कार्यातून समाजात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. उत्कृष्टता हे 'सूर्यदत्त'चे वैशिष्ट्य असून, गेल्या अडीच दशकांच्या प्रवासात 'सूर्यदत्त'ने 2003 पासून हा पुरस्कार सुरु केला आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, औद्योगिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात परिवर्तनवादी अमूल्य योगदाना देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना आजवर सन्मानित करून विद्यार्थी, पालक आणि समाजाला प्रेरणा देण्याचा प्रयत्न यामागे आहे.

पद्मभूषण पंडित भीमसेन जोशी, पद्मविभूषण शास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंजन, योगाचार्य पद्मभूषण डॉ. बीकेएस अय्यंगार, प्रख्यात अभिनेते पद्मभूषण अनुपम खेर, पद्मभूषण शिव नाडर, माजी पोलीस अधिकारी किरण बेदी, पद्मविभूषण मोहन धारिया, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आध्यात्मिक आणि प्रेरक वक्ते गौर गोपाल दास यांच्यासह अनेक मान्यवरांना या पुरस्काराने गौरवान्वित केले आहे, असे स्नेहल नवलखा यांनी नमूद केले.



# थोडक्यात



## एम्पॉवरहर24 : महिला उद्योजकांचे भविष्य बदलण्याची मोहिम

**पुणे (आरंभ पर्व) :** "शी लीड्स इंडिया" ने महिला उद्योजकांचे सक्षमीकरण व्हावे या उद्देशाने आयोजित केलेल्या 'एम्पॉवरहर24' या कार्यक्रमाच्या दुसऱ्या आवृत्तीचा समारोपाची घोषणा केली. 'एम्पॉवरहर24' ने केवळ पुणे आणि आजूबाजूच्या शेकडो महत्त्वाकांक्षी आणि आघाडीच्या महिला उद्योजकांनाच नव्हे, तर देशभरातील महिला उद्योजक आणि तज्ज्ञांना नेटवर्किंग व व्यवसाय वाढीच्या उद्देशाने या कार्यक्रमासाठी एकत्र आणले, याचा "शीलीड्सइंडिया" ला अभिमान आहे. गेल्या वर्षी झालेल्या उपक्रमाला अभूतपूर्व यश लाभले. त्यानंतर आणखी एका संधीची सर्वांना प्रतीक्षा होती. 'एम्पॉवरहर24' हा महिला उद्योजकांसाठी महिला उद्योजकांचा कार्यक्रम आहे. महिला उद्योजकांना कल्पना व्यक्त करण्यासाठी, त्यांच्या उपक्रमांना गती देण्यासाठी आणि नवीन भागीदारी करण्यासाठी हे व्यासपीठ म्हणून कार्य करते.

## विशेषांकासाठी लेखन साहित्य पाठवण्याचे आवाहन

**पुणे (आरंभ पर्व) :** अयोध्येतील श्रीराम मंदिर निर्माणाच्या वर्षपूर्ती निमित्ताने सोनेरी महाराष्ट्रच्या वतीने श्री रामलला प्राणप्रतिष्ठा वर्षपूर्ती विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येत आहे. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे 22 जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिरात श्री रामलला प्राणप्रतिष्ठेचा भव्य आणि देखणा सोहळा पार पडला होता. देशातील व जगभरातील कोट्यवधी हिंदू या अविस्मरणीय क्षणाचे साक्षीदार बनले होते. या उपक्रमांना व माहितीला 22 जानेवारीच्या अंकात सविस्तर प्रसिद्धी देण्यात येईल. याशिवाय जगभरातील कोट्यवधी हिंदूचे आराध्य दैवत असणाऱ्या प्रभू श्रीरामांविषयी सर्वांच्याच मनात आज आदर आणि ममत्वाचा भाव आहे. प्रभू श्रीरामांचे जीवनकार्य, त्यातून आजच्या आधुनिक काळात घ्यावयाचे धडे याविषयीचे लेख, कविता, अनुभव आमच्याकडे पाठवावे. हे सर्व साहित्य editor.sonerimaharashtra@gmail.com या ई-मेलवर किंवा 9673988770, 9763952172 या नंबर पाठवावे, असे आवाहन सोनेरी महाराष्ट्रच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'सुशीला-सुजीत' होणार "18 एप्रिल" रोजी प्रदर्शित

- पोस्टर प्रदर्शित करत चित्रपट प्रदर्शनाची घोषणा
- 'सुशीला-सुजीत' चित्रपटाच्या निमित्ताने स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
'सुशीला-सुजीत' या मराठी चित्रपटाचं चित्रीकरण संपन्न झालं असून चित्रपट 18 एप्रिल 2025 रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाबद्दल रसिक प्रेक्षकांमध्ये आणि चित्रपटसृष्टीत सुद्धा मोठी उत्कंठा लागून राहिली आहे. पोस्टरवर स्वप्नील आणि सोनाली यांचे चेहरे




एका की-होलमधून दिसतात. त्यांचे चेहरे पुरेसे बोलके असून त्यावरील अचंबित भाव स्पष्ट जाणवतात. त्यामुळे चित्रपटाबद्दलचे कुतूहल आणखी ताणले गेले आहे. ' दरवाजाच्या आड काय आहे गुपित..? सांगायला येत आहेत "सुशीला - सुजीत" अशी या पोस्टर ची tagline आहे. स्वप्नील जोशी, प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमाणे, निलेश राठी यांची निर्मिती असलेल्या 'सुशीला-सुजीत' चे दिग्दर्शन प्रसाद ओक करत आहेत. पॅनोरमा स्तुडिओज या चित्रपटाचे वितरक आहेत.

बिग ब्रेन प्रॉडक्शन्स आणि पंचशील एन्टरटेन्मेंट्सची ही निर्मिती आहे. प्रसाद ओक, स्वप्नील जोशी, सिनेमॅटोग्राफर संजय मेमाणे हे पहिल्यांदाच एकत्र येवून चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. प्रसाद ओक दिग्दर्शक आणि संजय मेमाणे सिनेमॅटोग्राफर हे एक यशस्वी कॉम्बिनेशन मानले जाते. पटकथा-संवाद अजय कांबळे यांचे आहेत.

"सोनाली आणि स्वप्नील हे थोडेसे वेगळे कास्टिंग या चित्रपटासाठी आम्ही केले आहे. या दोघांची कामाची पद्धत आणि इमेजसुद्धा भिन्न आहे. आज प्रदर्शित झालेल्या पोस्टरवर त्याची झलक दिसून येते," असे प्रसाद ओक म्हणाले.

चित्रपटाबद्दल बोलताना स्वप्नील जोशी म्हणाला, "या आगामी चित्रपटात कित्येक गोष्टी पहिल्यांदाच साध्य होत आहेत.'सुशीला-सुजीत'च्या नावापासूनच त्याचे वेगळेपण अधोरेखित होते. चित्रपटाबद्दल लोकांमध्ये आणि चित्रपटसृष्टीत कुतूहल आहे. सोनाली, प्रसाद आणि मी पहिल्यांदाच एकत्र येत आल्याने आमच्यासाठीही हा एक वेगळा अनुभव आहे."

### एयरटेल महाराष्ट्र आणि गोवा वायरलेस

# सब्सक्रायबर वाढीत ऑक्टोबर 2024 मध्ये अव्वल : ट्राई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतामधील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदात्यांपैकी एक असलेल्या भारती एयरटेलने ("एयरटेल") ऑक्टोबर 2024 मध्ये महाराष्ट्र आणि गोवा सर्कलमध्ये वायरलेस सब्सक्रायबर वाढीत नेतृत्व सिद्ध केले आहे. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडिया (TRAI) च्या अहवालानुसार, एयरटेलने या भागात 2,10,154 वायरलेस सब्सक्रायबर्स जोडले, ज्यामुळे त्याचा एकूण ग्राहक आधार 2,23,77,901 वर पोहोचला आहे.

एयरटेलने या सर्कलमध्ये त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले, जिथे सरकारी BSNL ने 22,403 नेट सब्सक्रायबर जोडले, तर खाजगी ऑपरेटर वोडाफोन आयडिया (VIL) आणि रिलायन्स जिओने अनुक्रमे 2,50,685 आणि 5,27,912 सब्सक्रायबरची घट नोंदवली.

राष्ट्रीय पातळीवर, एयरटेलने ऑक्टोबर 2024 मध्ये सर्व दूरसंचार सर्कलमध्ये एकूण 1.93 दशलक्ष (19,28,263) वायरलेस सब्सक्रायबर्स जोडले. या वाढीमुळे 31 ऑक्टोबर 2024 पर्यंत एयरटेलचा एकूण वायरलेस सब्सक्रायबर आधार 385.41 दशलक्ष (38,54,10,746) पर्यंत पोहोचला आहे. ही कामगिरी ग्राहक संपादन आणि बाजार विस्तारामधील एयरटेलच्या सततच्या नेतृत्वाचे प्रतीक आहे.

# आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे ऑप्टिगल® व्यावसायिक स्तरावर उपलब्ध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) या आर्सेलरमित्तल आणि निप्पॉन स्टील यांच्यामधील संयुक्त उद्यम असलेल्या कंपनीने आज महाराष्ट्रात जागतिक दर्जाचा कलर-कोटेड स्टील ब्रँड ऑप्टिगल®च्या व्यावसायिक स्तरावर उपलब्धतेची घोषणा केली. एएम/एनएस इंडियाने राज्यभरातील चॅनेल भागीदारांसाठी पुण्यामध्ये संमेलनाचे आयोजन केले, जेथे ऑप्टिगल®ची वैशिष्ट्ये, तसेच जवळपास 25 वर्षांपर्यंतची दीर्घकालीन वॉरंटी, उच्च दर्जाचे गंजरोधक आणि अत्याधुनिक संरक्षणाला दाखवण्यात आले.

या मीटिंगमध्ये खुले संवाद, माहितीची देवाणघेवाण आणि मार्केट ट्रेण्ड्स व भावी संधींबाबत चर्चा देखील करण्यात आली.

एएम/एनएस इंडियाची सध्या अंदाजे 700,000




टन कलर-कोटेड क्षमता आहे, तसेच 2026 पर्यंत ही क्षमता एक दशलक्ष टनपर्यंत वाढवण्याची योजना आहे.

या विस्तारीकरणासह कंपनीचा मार्केट शेअर आज 20 ते 22 टक्क्यांवरून 25 ते 27 टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी हा ब्रँड फक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये उपलब्ध होता, पण एएम/एनएस इंडियाने या वर्षाच्या सुरुवातीला भारतात अद्वितीय झिंक-अॅल्युनिमिअम-मॅग्नेशिअम तंत्रज्ञानाचा वापर करत आर्सेलरमित्तल पेटण्टेड ऑप्टिगल® चे उत्पादन सुरु केले.

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) येथील विक्री व विपणन विभागाचे संचालक आणि उपाध्यक्ष श्री. रंजन धार म्हणाले, "आमच्यासाठी महत्त्वपूर्ण असलेली बाजारपेठ महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यामधून पुण्यामध्ये चॅनेल भागीदारांच्या मोठ्या उपस्थितीमधून भारतातील व्यवसाय सहयोगींची अद्वितीय उत्पादन ऑप्टिगल®प्रती प्रबळ रुची दिसून येते. या संमेलनाने आमच्या व्यवसाय सहयोगींसोबत पुन्हा कनेक्ट होण्याची, या अद्वितीय जागतिक दर्जाच्या ऑफरिंगबाबत माहिती शेअर करण्याची आणि आमचे सहयोग प्रबळ करण्याची उत्तम संधी दिली, जेथे आम्ही 'स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्यूचर्स' घडवतो.

या संमेलनामधून आमच्या चॅनेल भागीदारांना अधिकतम मूल्य वितरित करण्यासाठी ग्राहक-केंद्रित्व व विश्वसनीयतेवरील आमचा प्रबळ फोकस दिसून येतो. कंपनीची ऑप्टिगल®ची प्रादेशिक व राष्ट्रीय फूटप्रिंट वाढवण्याची प्रबळ योजना देखील आहे."

ऑप्टिगल®ची वैविध्यता ब्रँडला व्यापक उपयोजनांसाठी अत्यंत लक्षवेधक पर्याय बनवते, जसे निवासी व व्यावसायिक प्रकल्पांसाठी रुफिंग, फेन्सिंग व क्लॅडिंग, प्री-इंजीनिअर्ड इमारतींसाठी विश्वसनीय मटेरिअल्स आणि आर्किटेक्चरल दर्शनी भागांसह विमानतळ, औद्योगिक गोदाम व स्टेडियम्ससाठी उच्च-कार्यक्षम स्टील.

महाराष्ट्रातील चॅनेल भागीदारांनी उत्साहात या अद्वितीय उत्पादनाचे स्वागत केले आहे, तसेच त्यांच्या व्यवसायांवर सकारात्मक प्रभाव पडण्यासाठी या उत्पादनाच्या क्षमतेबाबत आशा व्यक्त केली आहे.

व्हीएसटी इन्फ्रा अँड प्रोफाइल्स प्रायव्हेट लिमिटेडमधील श्री. दिव्यांश गुप्ता म्हणाले, "आम्हाला जागतिक दर्जाचा ब्रँड ऑप्टिगल® असण्याचा आनंद होत आहे, जो 25 वर्षांची वॉरंटी देतो, जी क्षेत्रातील कोणत्याही उत्पादनासाठी सर्वात दीर्घकालीन आहे."

याप्रसंगी मत व्यक्त करत विकास प्रोफाइलमधील श्री. अभिषेक महिपाल म्हणाले, "सादर करण्यात आलेली विशिष्ट ऑफरिंग ऑप्टिगल® बाजारपेठेत वरचढ ठरले आहे. यामुळे आमच्या उत्पादन श्रेणीचा विस्तार होण्यासोबत ग्राहकांच्या विविध गरजांची पूर्तता करण्याची आमची क्षमता देखील अधिक दृढ झाली आहे."

आणखी एक चॅनेल भागीदार विजयशांती रुफिंगमधील श्री. चेतन राठोड म्हणाले, "ऑप्टिगल® आमच्यासाठी गेम-चेंजर आहे. यामधील इको-फ्रेण्डली कंपोझिशन शाश्वत बिल्डिंग मटेरिअल्साठी वाढत्या मागणीची पूर्तता करते. या उत्पादनाचा दर्जा उल्लेखनीय राहिला आहे, ज्यामधून ग्राहकांना अपवादात्मक मूल्य मिळत आहे."

# एअरटेल आणि झी5 यांनी भागीदारी केली आहे आणि एअरटेल वायफाय ग्राहकांसाठी रोमांचक झी5 सामग्री प्रदान करणार आहे

**गुरुग्राम (भारत) (दै. आरंभ पर्व)**
भारती एअरटेल ("एअरटेल") भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक आहे आणि तिने भारतातील अग्रगण्य ओटीटी प्लॅटफॉर्म झी5 सोबत भागीदारी केली आहे, असे आज जाहीर केले असून आपल्या वायफाय ग्राहकांना आकर्षक डिजिटल सामग्री प्रदान करणार आहे. रु. 699 किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीपासून सुरु होणारे प्लॅन्स घेतलेल्या सर्व ग्राहकांना कोणतीही अतिरिक्त रक्कम न भरता त्यांच्या एअरटेल वायफाय प्लॅनचा भाग म्हणून झी5 सामील करून देण्यात येईल.

ही भागीदारी झाल्यावर, मूळ शोज, अतिशय लोकप्रिय शीर्षके (चार्टबस्टर टायटल्स), अनेक भाषांमधील ओटीटी चित्रपट आणि मालिकांचा समावेश असलेली झी5 ची खास सामग्री आता प्रेक्षकांसाठी एअरटेल वायफायवर उपलब्ध केले जाणार असून त्यांना डिजिटल सामग्रीची संपूर्ण यादी (कॅटलॉग) उपलब्ध होणार आहे. इतरांमध्ये सॅम बहादूर, आरआरआर, सिर्फ एक बंदा काफी है, मनोरथंगल, विक्कटकवी, द क्रॉनिकल्स ऑफ अमरागिरी, ऐंधमवेधम, ग्याराह ग्याराह यासारख्या लोकप्रिय शीर्षकांसह एअरटेल वायफाय ग्राहकांना आता 1.5 लाख+ तासांच्या सामग्रीचा आनंद उचलता येणार आहे.

अमित त्रिपाठी, मुख्य विपणन अधिकारी आणि ईव्हीपी ग्राहक अनुभव, भारती एअरटेल, म्हणाले, "भागीदारी एअरटेलच्या डी.एन.ए च्या केंद्रस्थानी आहे आणि आम्ही आनंदाने झी5 सोबत भागीदारी करून जागतिक दर्जाच्या डिजिटल सामग्रीची परिस्थितीक व्यवस्था तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमच्या सामग्री पोर्टफोलिओ मध्ये झी5 चा समृद्ध संदर्भविभाग (लायब्ररी) बऱ्याच गहनतेची भर घालत असून आमच्या वापरकर्त्यांसाठी एकंदर अनुभव वाढवत आहे. आमच्या ग्राहकांना सर्वोत्तम आनंद देण्याचा एकेरी कार्यक्रम (अजेंडा) हाती घेऊन आमचा सामग्री पोर्टफोलिओ तयार करण्याची बांधिलकी आम्ही स्वीकारली आहे".

मनीष कालरा, मुख्य व्यवसाय अधिकारी, झी5 म्हणाले, "झी5 येथे उच्च दर्जाच्या करमणुकीचे लोकशाहीकरण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत आणि हे आमच्या वैविध्यपूर्ण सामग्रीची लायब्ररी मोठ्या प्रमाणातील प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून देऊन केले जात आहे. प्रेक्षकांना विविध सामग्री प्रकारांमध्ये (जॉनर्स मध्ये), भाषांमध्ये आणि स्वरूपांमध्ये सुलभ मनोरंजनाचा अनुभव देण्याची बांधिलकी आम्ही स्वीकारली असून एअरटेल सोबतच्या सहकार्याने त्यास बळकट केले आहे. एअरटेल ब्रॉडबँड वापरकर्त्यांसाठी झी5 चे एकीकरण करून व्यापक प्रेक्षक वर्गाची पूर्तता करण्याचे आमचे उद्दीष्ट आहे आणि त्यायोगे प्रत्येक वापरकर्त्यासाठी आकर्षक, पसंतीच्या कथानकाची खात्री करत आहोत." ही भागीदारी एअरटेलच्या कौतुकास्पद वायफाय + टीव्ही ऑफरला अजून वाढवते, ज्यात 350 हून अधिक एचडी चॅनल्स आहेत आणि ग्राहकांना एअरटेल एक्सट्रीम प्ले उपलब्ध करून देत आहे. एअरटेल एक्सट्रीम प्ले एक असा व्यापक प्लॅटफॉर्म आहे जो सोनीलिव्ह, इरोसनाऊ, सननेक्स्ट, एएचए आणि इतर बऱ्याच गोष्टींतून 23 लोकप्रिय ओटीटी सेवांमधून सामग्री एकत्रित करतो. झी5 ची अॅमेझॉन प्राइम, नेटफ्लिक्स आणि हॉटस्टार सारख्या सध्याच्या देऊ केलेल्या गोष्टींमध्ये भर पडली आहे आणि म्हणून एअरटेल वायफाय ग्राहकांना चुटकीसरशी मनोरंजनाच्या पर्यायांचा अप्रतीम खजिना उपलब्ध आहे. त्यायोगे एअरटेल आपल्या ग्राहकांना सर्वांगीण आणि समृद्ध डिजिटल जीवनशैलीचा अनुभव प्रदान करण्यात स्वतःचे अग्रगण्य स्थान मजबूत करत आहे.

## थोडक्यात



### 1651 व्या कॅमेऱ्याचे उदघाटन

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** पारधी समाजातील लोकांचा पिढ्यान्‌पिढ्यांपासूनचा व्यवसाय आहे. त्यांची मुलेही पुढे हाच व्यवसाय करतात. हेच चक्र अनेक वर्षांपासून या समाजात सुरू आहे. या समाजातील मुलामुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी समाजसेवक - साहित्यिक नामदेव भोसले प्रामाणिकपणे काम करत असल्याने यांचा आदर्श घेण्यायोग्य आहे. पारधी समाजातील नवीन पिढीला दिशा, न्याय व गुन्हेगारी पासून परावृत्त करण्यासाठी ही मोठं योगदान असल्याचे मत कोल्हापूर परीक्षेत्राचे महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी व्यक्त केले. उरुळी कांचन (ता.हवेली) येथील तांबे वस्ती याठिकाणी आदिवासी सेवक व साहित्यिक नामदेव भोसले आयोजित कार्यक्रम परिवर्तनाची पाटशाळा ह्या कार्यक्रमांतर्गत 'एक कॅमेरा स्व-रक्षणासाठी आणि एक कॅमेरा पोलीसांच्या मदतीसाठी, या शेवराई सेवाभावी संस्थेच्या संकल्पनेतील उपक्रमाच्या 1651 व्या कॅमेऱ्याचे उदघाटन व आदर्श माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले, भामाबाई बाबुराव पवार, लीलाबाई बिरकीट भोसले, बिलांडीबाई मलवार पवार, शारदाबाई हरणशिकारी भोसले, अनिल वानवळा पवार, बिबीषन लिंबाजी चव्हाण, भिमराव संपत खलसे, सुनंदा राजेंद्र भोसले, या आदिवासी आदर्श माता - पित्यांचा सन्मान व बारामती अप्पर पोलीस अधीक्षक बारामती याच्याकडून आदर्श समाजसेवक म्हणून नामदेव भोसले सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी कोल्हापूर परीक्षेत्राचे महानिरीक्षक सुनिल फुलारी बोलत होते. याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक बारामती गणेश बिराजदार, दौंड उपविभागीय पोलीस अधीक्षक बापुराव धडस, उरुळी कांचनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील, आदर्श माता शेवराई ज्ञानदेव भोसले, डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेचे संचालक संजय टिळेकर, हवेली तालुका पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष विजय टिळेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र टिळेकर, मा.सरपंच राजेंद्र चौधरी, मा.सरपंच गणेश चौधरी, नंदकुमार टिळेकर, सुनिल गोते, दैना कांदबरीचे लेखक भास्कर भोसले, पत्रकार नितीन करडे, पत्रकार अमोल भोसले आदी ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये थोडक्यात आपल्या जीवनातील अनेक कटू अनुभव प्रसंग सांगितले आदिवासी सेवक साहित्यिक नामदेव भोसले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिंट व डिजीटल मिडीया पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष - पत्रकार सुनिल जगताप व आभार पोलिस पाटील विजय टिळेकर यांनी मानले.

### गीतेतील तत्त्वज्ञान महत्वपूर्ण. : प्रवचनकर डॉ. रवींद्र भोळे

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** गीता कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग शिकविते. ममकर्म, ममधर्म समजणे यासाठी म्हणजे गीतेचा अभ्यास होय. कर्तव्यापासून परावृत्त होणाऱ्या अर्जुनाला भगवंताने गीता कुरुक्षेत्रावर कथन केली व कर्तव्य कर्म करण्यासाठी प्रवृत्त करून युद्धासाठी सज्ज केले. माऊली ज्ञानेश्वरांनी गीतेतील तत्त्वज्ञानाचे विस्तारीकरण करून जगाला अमृतमय ज्ञानेश्वरी लिहून अविवेकांची काजळी घालवून, विवेक दीप उजळविला व साधकांना, योगीयांना निरंतर दिवाळीचा, आनंदमय चैतन्यमय ठेवा दिला. जीवनातील रहस्य समजण्यासाठी गीता व ज्ञानेश्वरीचे वाचन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. असे मत ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. समस्त ग्रामस्थ मंडळी सिंगापूर व विठ्ठल रुखमाई भजनी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सामुदायिक पारायण सोहळा सिंगापूर येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी हरिभक्त ह भ प डॉ. रवींद्र भोळे उरुळी कांचन यांचा प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशनच्या

# अध्यक्षपदी बाळासाहेब सांडभोर

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षपदी बाळासाहेब सांडभोर यांची तर सचिवपदी अमर टाटीया यांची एकमताने निवड झाली.

संस्थेच्या वार्षिक सभेत नवीन कार्यकारिणीची 2025 ते 2027 या दोन वर्षांसाठी निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी बाळासाहेब सांडभोर, उपाध्यक्षपदी नाझनीन शेख, सचिवपदी अमर टाटीया, सहसचिवपदी शिल्पा बुरसे, खजिनदारपदी राजेंद्र जांभळे, कार्याध्यक्षपदी मीनाक्षी पाटोळे व कायदेशीर सल्लागार पदी ॲड. साधना बाजारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



"मनुष्य सेवा हीच ईश्वर सेवा" या सेवाभावी दृष्टीने संस्थेने आत्तापर्यंत अनेक बेवारस मनोरुग्णांना स्वगृही किंवा सेवाभावी संस्थांमध्ये पाठवून त्यांचे पुनर्वसन केले आहे. गरिबांना किराणा वाटप तसेच नवीन कपडे वाटप, वृक्षारोपन, गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, सफाई कामगारांना स्वेटर वाटप, थंडीमध्ये गरजूंना ब्लँकेट वाटप, दिवाळीमध्ये दुर्गम भागातील गरजूंना नवीन कपडे व फराळ वाटप, गोशाळेतील मुक्या जनावरांना चारा वाटप अशी सेवाभावी कामे संस्था करीत आहे.

सांगली व सातारा चिपळूण येथील पूरग्रस्तांना मदत, दुष्काळी भागात टँकरने पाणीपुरवठा, मुली व महिलांसाठी स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी पारंपारिक शस्त्र लाठी-काठीचे प्रशिक्षण देणे, कोरोना काळात रक्तदान, मोफत भोजनालय, दुर्गम भागात किराणा किट वाटप तसेच बचत गटातील गरजू महिला भगिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी फाऊंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सखी मेळावा आयोजन असे अनेक स्तुत्य उपक्रम राबविले आहेत.

फाऊंडेशनचे सदस्य दर महिन्याला सामाजिक कार्यासाठी आर्थिक मदत जमा करत असतात. हे उपक्रम राबविताना शहरातील दानशूर व्यक्तींची मदतही फाऊंडेशनकडे जमा होत असते. समाजातील गरजूंना योग्य ठिकाणी योग्य मदत पोहचत असल्याने खेड तालुक्यातून, जिल्ह्यातून तसेच परदेशातील दानशूर व्यक्तींनी सुद्धा मदत जमा केलेली आहे.

समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून या पुढील काळात देखील काम केले जाणार आहे. सामाजिक कामात पुढाकार घेत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे, असे नवनिर्वाचित अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर यांनी सांगितले.

यावेळी वार्षिक सभेला दिलीप होले, संगीता तनपुरे, बाळासाहेब सांडभोर, सुनील वाळुंज, डॉ. नीलम गायकवाड, अमर टाटीया, राजन जांभळे, ॲड. मनीषा पवळे, ॲड. सुनिल वाळुंज, मीनाक्षी पाटोळे, मधुकर गिलबिले गुरूजी, राहुल मलघे, शिल्पा बुरसे, आकाश बोंबले, नाझनीन शेख, राहुल वाळुंज, संपदा सांडभोर, ॲड. साधना बाजारे, उत्तम राक्षे आदि संचालक उपस्थित होते.

## गॅस शव दाहिनी आणि प्रदूषण रोधक प्रणालीचे लोकार्पण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर यांच्या संकल्पनेतून आणि निधीतून बोपोडी येथील मुक्तिधाम स्मशानभूमीतील पहिल्या मजल्यावर बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक गॅस शवदाहिनी आणि प्रदूषण रोधक चिमणीचे लोकार्पण आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे नेते परशुराम वाडेकर, माजी नगरसेवक आनंद छाजेड, रिपब्लिकन पक्षाचे शिवाजीनगर विधानसभा अध्यक्ष अविनाश कदम, निलेश वाघमारे, सचिन चव्हाण ,ज्वेल अँथोनी, रुपेश पिल्ले, रिकेश पिल्ले, संजय पिल्ले, बाळू मोरे, बापू रणदिवे, आप्पासाहेब वाडेकर, कलावती भंडारी, नंदा निकाळजे, आरती देठे आणि परिसरातील नागरीक व पदाधिकारी उपस्थित होते.

"मुळा आणि पवना नदीच्या संगमावर असलेल्या मुक्ती धाम स्मशानभूमी बोपोडी येथे पूर आल्यानंतर स्मशानभूमी पाण्यात गेल्याने नागरिकांचे अंत्यविधीसाठी हाल होत होते. म्हणून या ठिकाणची गॅस शवदाहीनी पहिला मजला बांधून वर नव्याने बांधण्यात बसविण्यात आली आहे.

## ध्यानधारणेमुळे मन:शांती व नवचैतन्य - सरिता दीदी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संचेती हॉस्पिटल येथे शनिवारी पहिल्या जागतिक ध्यान धारणा दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त ध्यानधारणेचे शास्त्र आणि तंत्र यावर मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय वक्ता व राजयोग संस्थेतील वरिष्ठ शिक्षिका ब्रह्मकुमारी सरिता दीदी (सरिता राठी) यांनी मार्गदर्शन केले.याप्रसंगी संचेती हॉस्पिटलमधील डिजिटल प्रमुख रूपल संचेती,संचेती इन्स्टिट्युट फॉर ऑर्थोपेडिक्स ॲन्ड रिहॅबिलिटेशनचे प्रमुख डॉ.लवनिश त्यागी,वरिष्ठ भूलतज्ज्ञ डॉ.पी.एस.गर्चा आदी



मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय वक्ता व राजयोग संस्थेतील वरिष्ठ शिक्षिका ब्रह्मकुमारी सरिता दीदी म्हणाल्या की, मनातील विचारांचे काहूर दूर केल्यावर पुढची दिशा समजू शकते. माझ्यासोबतच असे का घडले असे विचार रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णामध्ये असतो.नकारात्मक विचार व भविष्याची चिंता असते. नातेवाईक देखील त्रस्त असतात. अशा वेळेस मन स्थिर करून, नकारात्मक विचार दूर करून व सद्य परिस्थितींचा स्वीकार करून आपण मन सशक्त बनवू शकतो.सशक्त मनाने आपण या परिस्थितींचा सामना करू शकतो.ध्यान हे आपल्या मनात सकारात्मक ऊर्जा प्रज्वलित करते . ध्यान-धारणा म्हणजे डोळे बंद करणे नव्हे तर खऱ्या अर्थाने डोळे उघडणे हे असते.

संचेती हॉस्पिटल्सने नुकतेच ध्यानधारणा कक्ष सुरू केला होता . पश्चिम महाराष्ट्रात अशा प्रकारचा हा पहिलाच कक्ष आहे.रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील कर्मचारी यांच्यासाठी हा कक्ष सुरु करण्यात आला आहे.आपला स्नेही किंवा नातेवाईक रुग्णालयात दाखल असताना त्याच्या काळजीपोटी येणारे नकारात्मक विचार दूर ठेवण्यासाठी या कक्षाचा लाभ अनेक रुग्णांचे नातेवाईक घेत आहेत.

## उत्तम आरोग्यासाठी एकल रनमध्ये धावले हजारो पुणेकर

- **धावणे हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली - कृष्णकुमार गोयल**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फ्रेंड्स ऑफ ट्रायबल सोसायटी, एम.आय. जी संस्था आणि कोहिनूर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने एकल रन हाफ मॅरेथॉनचे आयोजन बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून धावपटू तसेच सामान्य नागरिकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये लहान मुले, तरुणाई, प्रौढ तसेच वयोवृद्ध यांची विशेष उपस्थिती होती.




स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक कृष्णकुमार गोयल, राज्यमंत्री शेखर मुंदडा, एकलचे अध्यक्ष वसंत राठी, एम. आय जीचे. अध्यक्ष जितेंद्र लखोटिया, फ्रेंड्स ऑफ ट्रायबल सोसायटी मुंबईचे खजिनदार घनशाम मुंदडा यांच्या हस्ते फ्लॅग देवून करण्यात आले. या स्पर्धेत 3, 5, 10 व 21 किमी असे गट करण्यात आले होते.

गोयल म्हणाले की उत्तम आरोग्यासाठी रोज सकाळी स्वतःसाठी धावले पाहिजे. अशा स्पर्धेनिमित्त सर्वांना एकत्र येऊन विचारांची देवाण-घेवाण होते. एकमेकांच्या शारीरिक तंदुरुस्तीची आपल्याला माहिती मिळते. एखादी बाब जर समूहाने केली तर ती अधिक परिणामकारक ठरते. ते पुढे म्हणाले की या मॅरेथॉनचे आयोजन करण्यामागे हा उद्देश होता की युवकांना जोडणे, जनजागृती करणे आणि ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण आणि उन्नती करण्याच्या आमच्या उद्देश होता. रोज नियमितपणे धावावे कारण धावणे हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे.

शेखर मुंदडा म्हणाले की एकल रनच्या माध्यमातून देशभरातील दुर्गम खेड्यातील शेकडो शाळेत शिक्षण घेणारे गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम स्तुत्य आहे. एम आय जी संस्थेचे मला कौतुक करावे तितके कमीच आहे. मानवी जीवनातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे आरोग्य. ते व्यवस्थित असेल तरच आपण आपल्या जीवनाचा योग्य तऱ्हेने उपभोग घेऊ शकतो. यासाठी व्यायाम अत्यंत महत्त्वाचा आहे. धावणे असा एकमेव व्यायाम आहे, ज्यात संपूर्ण शरीराची एकाच वेळेस क्रिया होते.

वसंत राठी आणि जितेंद्र लखोटिया म्हणाले की या स्पर्धेत 3 हजार स्पर्धकांना सहभाग घेतला होता. यात विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, मेडल देवून गौरविण्यात आले. तसेच सहभागी स्पर्धकांना मेडल, प्रमाणपत्र आणि उत्तम आहार देण्यात आला. ते पुढे म्हणाले एकल अभियान ही एक लोकचळवळ आहे.

# उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची हांडेवाडी येथे नवीन बँकिंग शाखा

## हांडेवाडी शाखेसह बँकेची महाराष्ट्रात ८० बँकिंग आऊटलेट्स आणि देशभरात १०१५ बँकिंग आउटलेट्स

**हांडेवाडी (दै. आरंभ पर्व)**

उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने (उत्कर्ष एसएफबीएल) हांडेवाडी-पुणे येथे त्यांच्या नवीन बँकिंग आउटलेटची घोषणा केली आहे. या विस्ताराद्वारे हांडेवाडीतील रहिवाशांचा आर्थिक समावेश वाढविण्याची आणि अत्यावश्यक बँकिंग सेवा पुरवण्यासाठीची बँकेची वचनबद्धता अधोरेखित करते. हांडेवाडीतील या शाखेसह, बँकेने देशभरातील शाखांचा आकडा 1015, तर




महाराष्ट्र राज्यातील आकडा 80 पर्यंत पोहोचला आहे.

विस्ताराबद्दल भाष्य करताना उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) श्री. गोविंद सिंग म्हणाले, की 'पुण्यातील हांडेवाडी येथील आमच्या बँकेची नवीन शाखा राज्यातील आमचे जाळे (नेटवर्क) मजबूत करण्यासाठीचे आमचे समर्पण प्रतिबिंबित करते. आपल्या समृद्ध इतिहासासाठी आणि मजबूत सामुदायिक संबंधांसाठी ओळखले जाणारे, हांडेवाडी हा पुण्याचा अविभाज्य भाग आहे. हा परिसर त्याच्या ऐतिहासिक स्थळांसाठी प्रसिद्ध आहे जसे की शांत आगा खान पॅलेस, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक महत्त्व असलेले ठिकाण आणि सांस्कृतिक समृद्धी आणि सामुदायिक भावनेसाठी ओळखले जाणारे कोरेगाव पार्क. या शाखेचे उद्घाटन हांडेवाडीच्या गतिमान आणि झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येला पाठिंबा देण्यासाठी, शहरातील वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी आमच्या प्रवासातील एक पाऊल आहे'.

बँक आपल्या ग्राहकांना आर्थिक उत्पादने आणि सेवा प्रदान करणार असून, ज्यामध्ये बचत आणि चालू खाती, मुदत ठेवी आणि आवर्ती ठेवी यांचा समावेश आहे. आपल्या ग्राहकांच्या विविध आकांक्षा पूर्ण करण्यासाठी बँकेने गृहकर्ज, व्यवसाय कर्ज आणि मालमत्तेवर कर्ज यासारखी विविध कर्ज उत्पादने उपलब्ध केली आहेत.

बँकिंग शाखेमध्ये पायाभूत सुविधा, डिजिटल बँकिंग क्षमता आणि एटीएम नेटवर्कसह बँक एकात्मिक ग्राहक सेवा प्रदान करते. याशिवाय बँक इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) आणि कॉल सेंटर यांसारखे अनेक बँकिंग माध्यमे पुरवते.

समाजातील इतर घटकांना सेवा देताना अल्प-बँकिंग कर्जे (जेएलजी कर्जे), एमएसएमई (मायक्रो स्मॉल अँड मीडियम एंटरप्राईझेस) कर्ज, गृहकर्ज आणि मालमत्तेवरील कर्ज यासह इतर विभागांमध्ये सेवा देत नसलेल्या आणि सेवा न मिळालेल्या ग्राहक वर्गांना आर्थिक सेवा प्रदान करणे, हे उत्कर्ष एसबीएफएलचे उद्दिष्ट आहे. तसेच बँक ग्राहकांना टॅबलेट-आधारित 'डिजी ऑन-बोर्डिंग' ॲप्लिकेशनद्वारे शाखेला भेट न देता बँक खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध करते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.